अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र
# आरंभ
संपादक - दिपक थोरात MO.9860898564



बीड, मा. मुख्यमंत्री शिंदे यांच्या सोबत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार, भाजपा नेत्या पंकजाताई मुंडे आदींचे आगमन झाले, यावेळी ते तिघेही गोपीनाथ गडावर नतमस्तक झाले, यावेळी पंकजा ताईंनी त्यांचे स्वागत केले. यावेळी पालकमंत्री धनंजय मुंडे जिल्हाधिकारी दीपा मुधोळ - मुंडे जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी अविनाश पाठक यावेळी उपस्थिती होती.गोपीनाथ गड येथे स्वर्गीय गोपीनाथ मुंडे यांच्या कृती स्थळास अभिवादन केल्या नंतर ते पुढील कार्यक्रमासाठी येथून रवाना झाले.

बीड (महाराष्ट्र) | सायं.दैनिक | मराठी | वर्ष -०१ | अंक -७६ | मंगळवार दि.०५ डिसेंबर २०२३ | आरएनआय -एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ | किंमत ३ रू | । पाने ४
Beed (Maharashtra) | Daily Evening | MARATHI | Year-01 | Issue -76 | TUESDAY DT.05 DECEMBER 2023 | RNI : MAHMAR/2023/83965 | PRICE - 3 RUPEES | PAGES - 4



# भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर ;एक थोर विभूती

दलितांचे कैवारी,दलितांचा स्वाभिमान असणारे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर हे खरोखरच पुजणीय आहेत.पण ते पुजनीय असले तरी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरावर आजही ताशेरे ओढणारी मंडळी भरपूर आहे.विचार येतो की ही मंडळी आमच्या बापाला जिथे सोडत नाहीत,तिथे आम्ही तर मुख्य निशाण्यावर.

डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचे महापरीनिर्वाण ०६ डिसेंबर १९५६ ला झालं.पुर्ण जनता शोकसागरात बुडाली.प्रत्येक जनमाणूस डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांना श्रद्धांजली वाहण्यासाठी चर्चगेटला आला.कधी पाहिली नव्हती एवढी प्रचंड गर्दी मुंबईच्या लोकांनी त्या वेळी अनुभवली.त्यानंतर त्या खालोखाल गर्दी शिवसेना प्रमुखाच्या मृत्यूवेळी अनुभवली.डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर व बाळासाहेब ठाकरे ही दोन मंडळी अशी होवून गेलीत की ज्यांनी मृत्यूवेळीही अशी गर्दी खेचली. पण आजही मृत्यूनंतर डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांचा काही मंडळी घोर अपमान करतात.नव्हे तर डॉक्टर बाबासाहेब हे नवविचारांचे जनक जरी असले तरी आजही त्यांना शिव्या हासडणारे भरपूर आहेत.मात्र त्यांनी केलेल्या कार्याचा लाभ सर्वजण सहखुशीनं घेतात.मग ते कोणत्याही धर्माचे जातीचे का असेना.

डॉक्टर बाबासाहेबांनी केवळ दलितच समाजासाठी कार्य केले नाही तर त्यांनी इतरही समाजासाठी बरंच काही केलं.कलमा लिहितांना ते जरी दलित समाजाचे असले तरी त्यांनी ते न मानता प्रथम ओबीसी समाजाला प्राधान्य देवून त्यांच्यासाठी प्रथम कलम लिहिली.त्यांनीच केलेल्या कार्यामुळे आज निव्वळ दलितच नाही तर महिलावर्गांनाही फार मोठं स्थान मिळालं आहे.महिलांचा विचार केल्यास पुर्वी महिलांना स्वतंत्र्य स्थान नव्हतं.म.फुलेंनी कार्य केले होते.पण पाहिजे त्या प्रमाणात स्रिया सुखी झाल्या नव्हत्या.पण आज त्याही सुखी झालेल्या दिसत आहेत.हे घटनेने घडविलेले आहे.घटनेत स्पष्ट कलमांतर्गत प्रत्येकाला अधिकार देवून बांधुनच ठेवले आहे.

देव देव करुन त्या देवासाठी झिजण्यापेक्षा माणसानं शिक्षण शिकावं.शिक्षणातूनच माणूस मोठा होत असतो.हे डॉक्टर बाबासाहेबांनीच आपल्याला शिकवलं नव्हे तर या देवाच्या नावाने कोंबड्या बक-याचा बळी देवून जे काही पातक होत होतं.ते होवू नये म्हणून डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी ते पोषण्यावरच बंदी घातली.डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर हे पाप पुण्य,नशीब मानत नव्हते.तसेच ते अंधश्रद्धा ही मानत नव्हते.त्यांनी घेतलेल्या बावीस प्रतिज्ञेमध्ये याच गोष्टीचा उल्लेख आहे.ते सुरुवातीलाच म्हणतात.मी देव धर्म मानणार नाही.राम क्रिष्ण मानणार नाही.हे का म्हटलं असेल त्यांनी.यात महत्वाचं कारण आहे विटाळ आणि हिंदू धर्माने दलित समाजाला दिलेली वागणूक.विटाळाच्या दृष्टचक्रात एवढा अत्याचार दलित समाजावर होत असतांना या समाजातील माणसेही त्याचीच मनोभावे पुजाअर्चना करीत असतांना तो देव का धावला नाही?या प्रश्नांचे उत्तर डॉक्टर बाबासाहेबांना न सापडल्याने त्यांनी या देवी देवतांना त्यागलं आणि विटाळावर सर्वोत्तम उपाय शोधून काढला व तो अंमलातही आणला.

हिंदू धर्मात विटाळ मानण्याची प्रथा होती.दलितांना मंदीर प्रवेश नव्हता.मंदीरप्रवेश तर सोडा,साधे सकाळी दहा वाजेपुर्वी सवर्ण वस्तीत जाण्याची परवानगी नव्हती.मग असे असतांना डॉक्टर बाबासाहेबांनी धर्मच बदलविला.तुमचा धर्मही नको आणि तुमचं मंदीरही नको आम्हाला प्रवेशाला.मीच नाही तर माझी जातवाली मंडळी देखील तुमच्या मंदीरात पुजेला येणार नाही.असा विचार करीत धर्म सोडला व पवित्र असा बौद्ध धम्म स्विकारला.धम्म स्विकारतांनाही डॉक्टर बाबासाहेब यांनी इतर धर्माचा अभ्यास केला.कोणी तर आपला धर्म कसा श्रेष्ठ हे पटवून सांगत आपला धर्म डॉक्टर बाबासाहेबांना स्विकारायला लावला.पण डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी तो धम्म न स्विकारता बौद्ध धम्म स्विकारला.कारण हा धम्म वास्तववादावर होता.अंधश्रद्धा वा चमत्कार या धम्मात नव्हते.

आता मात्र लोकं डॉक्टर बाबासाहेबांनाच नाही तर धम्मालाही नावे ठेवतात.म्हणतात.बोधिसत्व तथागतांना ज्ञानप्राप्ती कशी झाली?हा तर चमत्कार नाही का?मी तयांना सांगू इच्छितो की ज्ञानप्राप्ती होणे ही काही एक वस्तू नव्हती.तो एक विचार होता.माणसाच्या मनात चांगले वाईट असंख्य विचार येत असतात.त्यातील दुःखावर विजय मिळविणारा एक चांगला विचार तथागत गौतम बुद्धाच्या मनात आला.म्हणून तो चमत्कार नाही.

आजही धम्म चांगला आहे.धम्म वाईट नाही.पण काही समाजकंटक या धम्मालाही बदनाम करण्याचे षडयंत्र करतात.यात चमत्कार,पुजाविधी,अंधश्रद्धा नसली तरी काही समाजकंटक आजही धम्मातही चमत्कार,अंधश्रद्धा व पुजाविधी मानतात नव्हे तर डॉक्टर बाबासाहेबांनी घेतलेल्या बावीस प्रतिज्ञेत कोंबडे बकरे पाळणार नाही असे असून देखील कोंबड्यांचं पालन होतं.बकरेही पाळले जातात.शिवाय मांसही भक्षण केलं जातं.बौद्ध धम्मात जी पंचशीलं आहेत,त्याचे पालन होत नाही.दारु पिणे वज्र असतांना तसेच धनसंचय करणे वज्र असतांना आम्ही ते करतोच.खोटे बोलणेही वज्र असतांना आम्ही खोटे बोलतो.नव्हे तर आपलेच बांधव यशाच्या शिखरावर जात असतांना त्यांचे पाय ओढतो.सत्ताप्राप्तीसाठी वेगवेगळे गट नव्हे तर पक्ष स्थापन करतो आणि आपल्याच बांधवांच्या विरोधात लढतो.आपल्याच बांधवाला निवडणुकीत पाडतो नव्हे तर पाडण्याचा प्रयत्न करतो.हे भीमा, तू धम्मपरीवर्तन सांगीतलं होतं नव्हे तर केलं होतं.पण ते करीत असतांना तू हेच सांगीतलं होतं का?पुजाविधीला वज्र मानणारा तू आज धम्मात चक्क नारळ वाहतांना दिसतात तुला.तुझं भगवंकरण होतांना दिसत आहे.तू हार, बेल,फुल या गोष्टीला थारा दिला नाही.आज तेच घडत आहे धम्मात आणि याच गोष्टीचा फायदा ते घेत आहेत.आज मंदीरप्रवेशाला विटाळ नाही.म्हणूनच की काय,आज तुझेच बांधव मंदीरप्रवेशही करतात.कालचे ते जुने दिवसं विसरुन.हे भीमा,हेच सांगीतलं का आम्हा.नाही ना.मग आम्ही बिघडायला हवं की सुधरायला हवं.तू आम्हाला शांतीचा मार्ग दाखवलाय.खरं आहे.मग आम्ही शांती मानायला नको का?आपसी भांडणं बंद करायला नको का?होय तुझं म्हणणं बरोबर होतं.पण कोण ऐकणार आमचं.तुझेच ऐकतात सगळं.कारण तू बाप आहेस आमचा.त्यांचा आणि सर्वांचाच.तेव्हा एकतर तू मरायला



नको होतास.पण आतातरी एक काम कर.हे भीमा,तू इकडे तिकडे न पाहता,आढेवेढे न घेता पुन्हा जन्म घे.जन्म घेवून ये आणि आम्हाला पुन्हा एकदा नीट समजावून सांग.आमचे काय चुकले ते.पुन्हा कधीही न विसरण्यासाठी.महापरीनिर्वाणाच्या दिवशी.त्याच दिवशी त्याच तारखेला आणि त्याच वेळेला.आम्ही तुमचं कालचं ऋण विसरलो असलो तरी पुन्हा केलेलं दुसरं ऋण कधीच विसरणार नाही. बाबासाहेबांचा कोणीही अपमान करु नये

या महामानवानं चवदार तळ्याचं आंदोलन केलं.चवदार तळे......इतिहास साक्षीचा पुरावा.त्यापुर्वी या देशात विश्वकोटीचा विटाळ होता.भेटीबंदी,व्यवहारबंदी,बेटीबंदी रोटीबंदीने कळश गाठला होता.सारा देशच पोखरला होता.स्पर्शाचा विटाळ तर सार्वजनिक होता. सकाळी दहा वाजेपर्यंत तसेच रात्री अंधार पडल्यावर गावात जायला मनाई होती.सकाळी यासाठी गावात जायचे नाही कारण स्पृश्य स्रीया अंगणात शेणाचा सडा टाकतात.सडा टाकतांना त्यात पाणी असते.अंगण ओलं असते.त्यात पाय उमटतात.सावली पडते त्यामुळे विटाळ होतो तसेच दिवस मावळल्यावर दिसत नसल्याने अंगणात अस्पृश्य माणुस जाणुनबुजून एखाद्या अस्पृश्य माणसाला हात लावु शकतो हा धोका.त्यापेक्षा बंदी घातलेली बरी याचा विचार करुन दिवस मावळल्यावर बंदी.

पाण्याला स्पर्श करणे हा विटाळ समजण्यात येई.त्यामुळे साहजिकच सर्व प्रकारच्या गोष्टीपासुन ही दलित मंडळी वंचित होती.जणु हा परिसर विटाळ परिसर व प्रत्यक्ष गाव विटाळ गाव बनलं होतं.मात्र गावातील काही लोकांना वाटायचं की हा विटाळ बंद व्हावा.पण ते काही करु शकत नसत कारण तसा प्रयत्न करणा-यांना गाव समाजात व्यवहारबंदी करीत असे.वाळीत टाकत असे.वाळीच्या वेदना भयंकर होत्या.त्यामुळे चवदार तळ्याचा सत्याग्रह झाला नसता तर भेदभाव कधीही मिटला नसता.असे म्हणणे खरे ठरते.

चवदार तळ्याच्या सत्याग्रहात इतर समाज साथ देवो अगर न देवो,पण महार जातीने कंबर कसली होती.याचा परिणाम चवदार तळ्याच्या आंदोलन वेळी दिसला.दि.१२/१२/१९२७ ला सनातन समाजाने चवदार तळे चौधरी कुटुंबाचे असल्याने हे तळे निर्णय होईपर्यंत चवदार तळ्याचे पाणी पिण्यास दलितांना बंदी असावी.असे जे म्हणणे मांडले.त्याला सबब न्यायालयाने स्थगिती देत म्हटले की निर्णय होईपर्यंत अस्पृश्य माणसाला चवदार तळ्याच्या भागात जाता येवु नये.तरीही असंख्य संख्येने ही महार मंडळी प्रसंगी कैद भोगु पण चवदार तळ्यावर जावु यासाठी स्वतः मंजुरी फामवर सही करण्यासाठी रांगेने प्रतिज्ञापत्र भरण्यासाठी उभी होती.चवदार तळ्याचा मुकदमा तारीख पे तारीख करत तब्बल दहा वर्ष चालला.यात बाबासाहेबांना अपार त्रास सहन करावा लागला घरदार स्वतःची पोरं बारं प्रकृती संसार याकडे लक्ष न देता बाबासाहेबांनी या मुकदम्यासाठी सर्वस्व पणाला लावले.ते येथील तमाम अस्पृश्य समाजाने कधीच विसरु नये.कधीकधी त्यांच्या जवळ पैसेही नसायचे.तरीही मुंबईला जावुन हा खटला लढला गेला.केवळ चवदार तळ्यावर जावुन पाण्याला स्पर्श करुन चवदार तळ्याचा सत्याग्रह झाला नाही.

खालच्या न्यायालयात खटल्याचा फैसला १९३४ ला लागल्यानंतरही सनातन्यांनी आणखी पिटीशन हायकोर्टात टाकली.पण बाबासाहेब नरमले नाहीत.एरवी त्यांच्यासोबत लढायला प्रति वादी म्हणुन शिवतरकर मास्तर, कृष्णा सायनाक, गण्या मालु ,कानु विठ्ठल इत्यादी मंडळी होती.हा खटला १९३७ ला जींकला जींकणे भागच होते.जर हा खटला बाबा हारले असते तर आजही पाणी पिण्यास दलितांना बंदी राहिली असती.आजही विटाळ राहिला असता.

महत्वाचे म्हणजे बाबासाहेब चवदार तळ्याचा खटला जींकले.त्यानुसार पाणी पिणे स्पर्श करणे.ह्या बाबत विटाळ पाळणे बंद झाले.महाडात पिण्याच्या पाण्यासाठी दुसरी स्वतंत्र्य व्यवस्था नसल्याने सनातन्यांना अस्पृश्यांना पाणी पिवु देणे भागच होते.नाहीतर न्यायालयाचा अवमान म्हणुन स्पश्यांना किती संकटाला सामोरे जावे लागले असते याचा अंदाज लावणे कठीण.२५ डिसेंबर १९२७ ला मनुस्मृती जाळुन दलितांवर लादण्यात येणा-या शिक्षेची अक्षरशः बाबासाहेबांनी होळीच केली होती.त्यामुळे मनुच्या नियमांना कात्रीच लावता आली.तसेच पोशाख बदलल्याने अस्पृश्य ओळखु न आल्याने विटाळ संपुष्टात आला.

आज बाबासाहेब हयात नाही.पण त्यांनी दलितांसाठी व इतरही समाजासाठी आयुष्य वेचलं.म्हणुन त्यांचे जागोजागी पुतळे बांधले आहेत.हे पुतळे म्हणजे दलित व इतर समाजाची प्रेरणा तसेच त्यागाचं प्रतिक.केवळ त्यांनी अस्पृश्यांसाठीच केलं नाही तर ती मनुस्मृती जाळुन स्रीयांनाही दास्यत्वातुन सोडवले.मग ती कोणत्याही जातीची असो.एवढेच नाही तर संविधान लिहितांना देशातील सर्व नागरिकांना न्याय स्वातंत्र्य समतेचा अधिकार मिळवुन दिला.यानुसार नोक-या पदोन्नति मधुन कोणावर अन्याय झाल्यास त्याला न्यायालयात दाद मागण्याचा अधिकार ही देशातील सर्वच जातीधर्माच्या लोकांस प्राप्त झाला.त्यामुळे खरं तर या देशातील नागरिकांनी बाबासाहेबांचे उपकार मानले पाहिजे.पण तसे घडत नाही.आजही बाबासाहेबास त्यांच्या मृत्युपरांत छळले जाते.शेणाचा पुतळ्यावर मारा केला जातो.राग कोणता तर चवदार तळ्याचा.....कदाचित या समाजकंटकांना चवदार तळ्याच्या घटनाक्रम ही माहित नसेल.

बाबांनो हे लक्षात घ्या की चवदार तळ्याच्या आंदोलनाच्या वेळी आम्हाला तुमच्याच समाजातील काही आजोबा पणजोबांनी माणुसकीच्या नात्याने मदत केली होती.तुम्ही का माणुसकी सोडताय?बाबासाहेबांनी केवळ अस्पृश्यच लोकांसाठी केलं नाही तर तुमच्याही जातीसाठी केलं ओबीसी साठी ३४९ वी कलम जेव्हा लिहीली तेव्हा तुमच्याच समाजातील संसदेतील लोकांनी विरोध केला होता.त्यावेळी याच बाबासाहेबांनी मंत्रीपदाचा राजीनामा दिला होता.केवळ तुमच्यासाठी.हे विसरु नका.हे माहित आहे का तुम्हाला.संविधान बनवितांना समिती बनवली खरी.पण ती कुचकामी ठरली.सगळं बाबासाहेबांना करावं लागलं.शिवाय संसदेत विधेयकं पुराव्यासह मांडावी लागली.सरतेशेवटी डाँ.राजेंद्रप्रसांदानी बाबासाहेबांची पाठ थोपटली.हे किती जणांना माहित आहे.हे संविधान अठरापगड जातीतील कोणत्याच माणसाला बनवता आले नाही.ही शोकांतिका या भारताची.तरीही तुम्ही या बाबासाहेबांचा अपमान करता.त्यांच्या लेकरांचा अपमान करता.कुणीही बाबासाहेबांचा अपमान करु नये.आपण सगळे एक आहोत.बाबासाहेब प्रेरणास्रोत आहेत सर्वांचे.मग ते कोणत्याही जातीतील का असेना.



पाटोदा तहसिलदार पदी संतोषजी बंन साहेब नियुक्ती झाल्याबद्दल त्यांनां शुभेच्छा देताना दत्ता भाऊ साठे

## परळीत येण्याआधीच शासन आपल्या दारीच्या पूर्वसंध्येला सरकारने दिली परळीला दिली १४० कोटींची भेट

### सुवर्ण जयंती नगरोत्थान योजनेतून शहरातील २६ रस्त्यांच्या कामांस १४१ कोटी ७० लक्ष रुपयांच्या आराखड्यास प्रशासकीय मान्यता प्राप्त

परळी ।प्रतिनिधी

परळीत आज राज्य शासन आपल्या दारी येत असून शासनाने परळीत येण्याच्या पूर्वसंध्येलाच परळीवासीयांना तब्बल १४१ कोटी रुपयांच्या विकास कामांची भेट दिली आहे. कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी परळी नगर परिषदेमार्फत प्रस्तावित केलेल्या रस्ते व नाल्यांच्या २६ महत्वाच्या कामांना १४१ कोटी ७० लक्ष रुपये निधीस प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. याबाबतचा शासन निर्णय आज नगर विकास विभागाने निर्गमित केला आहे. कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी मुख्यमंत्री तथा नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे यांचे, तसेच उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार व राज्य सरकारचे आभार मानले आहेत.

दरम्यान आज राज्य शासनाचा शासन आपल्या दारी हा कार्यक्रम मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार, कृषिमंत्री धनंजय मुंडे यांच्यासह मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न होत असुन, या कार्यक्रमाच्या निमित्ताने जिल्ह्यातील सुमारे १५०० कोटी रुपयांच्या विकासकामांचे भूमिपूजन मान्यवरांच्या हस्ते संपन्न होणार आहे. तर जिल्ह्यातील तब्बल २२ हजार लाभार्थींना विविध शासकीय योजनांच्या लाभाचे थेट वितरण करण्यात येणार आहे.

## गळफास घेऊन तरुणाची आत्महत्या

टाकरवण (बातमीदार)

माजलगाव तालुक्यतील टाकरवण येथील रहीवाशी आसलेले संजय भगवान पवार (वय ३१) यांने चितेगाव ता छत्रपती संभाजीनगर येथे रविवार ता. ०३ रोजी राहत्या घरी गळफास घेऊन आत्महात्या केली. संजय पवार हे गेली तिन वर्षापासुन चितेगाव येथे कामानिमीत्त आपल्या कुटुंबा सोबत राहत होते. रविवार रोजी रात्री ११ वाजण्यच्या सुमारास त्यांनी दोरीच्या साह्याने गळफास लावुन आत्महात्या केली हा प्रकार उघडकीस येताच त्याला रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र उपचारापूर्वीच त्याचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी घोषित केले. आत्महत्येचे कारण अद्याप समजू शकले नाही. पुढील तपास बीकीन पोलीस करीत आहेत.





माजी आमदार रमेश कदम साहेब यांचा कट्टर समर्थक (वेदांत भाऊ कांबळे) आपणास वाढदिवसाच्या लाख लाख शुभेच्छा.

## माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांच्या वाढदिवसानिमित्त ३० ठिकाणी भव्य रक्तदान शिबीर

बीड ।प्रतिनिधी

बीड जिल्ह्याचे भुमिपुत्र लोकनेते माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांच्या वाढदिवसानिमित्त जिल्हाभरात भव्य रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले असून दि.०७ डिसेंबर रोजी बीड मतदार संघातील ३० ठिकाणी रक्तदान शिबीर घेण्यात येणार आहे. या शिबीरामध्ये कार्यकर्ते, विद्याथी, पालक आणि जनतेने रक्तदानासारखे मोलाचे दान करून सहकार्य करावे असे आवाहन बाबूशेठ लोढा, नितीन लोढा, सखाराम मस्के, मनोज पाठक, माजी नगरसेवक विष्णू वाघमारे, राजेंद्र काळे, शिवाजीराव जाधव, सरपंच सचिन घोडके, महारूद्र वाघ, गोविंद जाधव, अर्जुन बहीरवाळ, दिलीप आहेर, धनंजय जगताप, विष्णू जाधव, भाऊसाहेब जानवळे, अर्जुन नरवडे, अशोक सोळूंके, अनिल निर्मळ, राजू पटेल, हनुमान जगताप, हनुमान आगाम, सुरेश काशिद, कांतराव सुरवसे, गोरख धन्ने, कृष्णा पितळे, कैलास येडे, ॲड.शेख खाजा, राजेंद्र बनसोडे, अमृत काका सारडा, जयदत्त थोटे, श्रीकांत माने, कपिल सोनवणे, मनोज मस्के, कैलास लगड, नवनाथ कुलकर्णी, सखाराम आखाडे, आंबादास गुजर, महेश सिंगन, दत्ता गायकवाड, प्रविण सुरवसे, अशोक आमटे, कल्याण खांडे, अंकुश चव्हाण, देवीलाल चरखा आणि काकू-नाना प्रतिष्ठाणच्या वतीने करण्यात आले आहे.

खालील ठिकाणी रक्त दात्यांसाठी रक्तदानाची व्यवस्था करण्यात आली असून यासाठी ठिकठिकाणचे कार्यकर्ते, पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत. आपल्या लाडक्या नेत्याच्या वाढदविसानिमित्त होणारे हे भव्य रक्तदान अनेक गरजू रूग्णांना जीवदान देणारे ठरणार आहे. यासाठी रक्तदात्यांनी खालील ठिकाणी रक्तदान करून सहभाग नोंदवावा.

विनायक माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय पेठ बीड, गीता कन्या माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, गजानन माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय राजुरी (न.) ता.बीड, कृषी पंडीत भागुजीराव ढेकळे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, पाडळसिंगी, ता.गेवराई, जि.बीड, पाडळी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, पाडळी, ता.शिरूर (का.) जि.बीड, कालिकादेवी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, शिरूर (का.), जि.बीड, साक्षाळपिंप्री माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, साक्षाळपिंप्री, ता.बीड, नागनाथ माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, मोरगाव, ता.बीड, रामकृष्ण माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, बोरगाव, ता.केज, यशवंत माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, कुर्ला, ता.बीड, शिवणी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, शिवणी, ता.बीड, आर्वी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, आर्वी ता.शिरूर (का.) जि.बीड, वडगाव माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, वडगाव(गुंधा), ता.बीड, पाटोदा माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, पाटोदा (बे.) ता.जि.बीड, नंदीग्राम माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, नांदूरघाट, ता.केज, पिंपळवाडी हायस्कूल, पिंपळवाडी, ता.जि.बीड, लोणी हास्कुल, लोणी, ता.शिरूर(का.), अंजनवती हायस्कुल, अंजनवती, ता.जि.बीड, बोरखेड हायस्कुल, बोरखेड, संत एकनाथ विद्यालय, पालसिंगन, ता.जि.बीड, कोरड्याचीवाडी हायस्कुल, कोरड्याचीवाडी, ता.केज. जि.बीड, जगदंबा हायस्कुल, राक्षसभुवन(तांबा), ता.शिरूर(का.) जि.बीड, माध्यमिक आश्रम शाळा, पोखरी, ता.बीड, औषध निर्माण शास्त्र महाविद्याल, म्हसोबा फाटा, सोनाजीराव क्षीरसागर वैद्यकिय महाविद्यालय, बीड, कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, पिंपळनेर तसेच रायमोहा, चौसाळा आणि येळंबघाट या ठिकाणच्या प्राथमिक आरोग्य केंद्रात रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आलेले आहे.



बीड, मा. मुख्यमंत्री शिंदे यांच्या सोबत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार, भाजपा नेत्या पंकजाताई मुंडे आदींचे आगमन झाले, यावेळी ते तिघेही गोपीनाथ गडावर नतमस्तक झाले, यावेळी पंकजा ताईंनी त्यांचे स्वागत केले. यावेळी पालकमंत्री धनंजय मुंडे जिल्हाधिकारी दीपा मुधोळ - मुंडे जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी अविनाश पाठक यावेळी उपस्थिती होती.गोपीनाथ गड येथे स्वर्गीय गोपीनाथ मुंडे यांच्या कृती स्थळास अभिवादन केल्या नंतर ते पुढील कार्यक्रमासाठी येथून रवाना झाले.



## रयत शिक्षण संस्थेचे कनकालेश्वर विद्यालय बीड येथे ३२ वर्षांनी भरला माजी विद्यार्थी शिक्षक स्नेहमिलन मेळावा

शहरातील कनकालेश्वर विद्यालय बीड येथे दिनांक २६/११/२०२३ ,वार रविवार रोजी तब्बल ३२ वर्षांनी सन १९९१, दहावी च्या माजी विद्यार्थी आणि शिक्षक यांचा ऋणानुबंध गुरुशिष्यांचे या कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक मा.श्री शेकडे सर तर विशेष अतिथी पदी सत्कारमूर्ती मा.श्री शिंदे सर, मा.श्री वाघमारे सर, मा.श्री गोलेकर सर, मा.श्री समेळ सर, मा.श्री ढाकणे सर, मा.श्री काजी सर, मा.श्रीमती क्षिरसागर मॅडम, मा .श्री धस सर श्री वैद्य सर आणि मा.श्री मोरे मामा उपस्थित होते. सर्व प्रथम सर्व शिक्षकांचे पुष्पवृष्टी आणि गुरू मंत्राच्या मंत्रमुग्ध वातावरणात स्वागत करण्यात आले त्यानंतर दिप प्रज्वलन आणि कर्मवीर भाऊराव पाटील , डॉ बाबासाहेब आंबेडकर, छत्रपती शिवाजी महाराज,अण्णाभाऊ साठे,शाहू महाराज,महात्मा ज्योतिबा फुले, लक्ष्मीबाई पाटील यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या शुभ हस्ते झाले.संविधान दिनानिमित्त संविधान उदेशिकेचे सामूहिक वाचन करण्यात आले.तदनंतर सर्व शिक्षकांचा माजी विद्यार्थीच्या हस्ते भेटवस्तू, मोत्यांची माळ ,श्रीफळ ,शाल फूल देऊन सत्कार करण्यात आला.त्यानंतर निसर्ग नियमा प्रमाणे जे शिक्षक आणि आपले वर्ग मित्र मैत्रिणी आपल्यात नाहीत तसेच २६/११ च्या दहशदवादी हल्ल्यात शहीद झालेल्या वीरांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

माजी विद्यार्थ्यांतर्फे शाळेसाठी भेट स्वरूपात ब्ल्यू टूथ स्पीकर देण्यात आला. यावेळी वर्ग मित्र मैत्रिणीनी आपल्या शालेय जीवनातील जुन्या आठवणींना उजाळा देत प्रत्येकाने आपला परिचय करून दिला.सर्वांनी जुन्या आठवणी यावर मनसोक्त गप्पा मारत स्नेहभोजनचा आनंद घेतला .दुपारच्या स्नेह भोजनानंतर गीतगायन करून आपल्या तील कला सादर केल्या.शिक्षकांनी आपापले मनोगत व्यक्त करतांना काही जुन्या आठवणी सांगत सर्व विद्यार्थ्यांना पुढील आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या.या कार्यक्रमात माजी विद्यार्थी अनिल गाडेकर,अशोक वाघमारे, असिफ पठाण, केशव कुलथे, गणेश निर्मळ,दत्ता कसबे,नवनाथ दलवे,प्रशांत गवंडर,बबन राऊत,रमेश गवळी, राधाकिसन कटारे , लकुल मुळेकर, लक्ष्मीकांत वैष्णव लक्ष्मीकांत मुळे, ,विजय जाधव,विजय वाघमारे,विलास जाधव,विलास भुसारी, शशिकांत वालूनजकर,शिवप्रसाद शहाणे,शिवानंद साळप्पा, शेख अबेदमिया,शेख निजाम,संतोष डा वकर ,सचिन पवार,सुरेश शेटे,हनुमान दळवे,हमीद मकराणी,संजय देवरात,रमेश बनसोड, कांनगावकर,जयश्री राऊत,रुपाली खेडकर, विद्या बागडे,शिवकन्या आवारे,सरोज ताठे, सीमा कुलकर्णी,सुषमा खडकेआणि राजेश्री राजमाने उपस्थित होते.सर्वांना ग्रुप फोटो आणि पेन देत निरोप देण्यात आला.या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन श्री.सय्यद फारुख,सौ.मीरा मोहिते- उकांडे ,श्री हिरालाल जाधव,श्री भास्कर ढवळे यांनी तर प्रास्ताविक श्री राहुल बोरा आणि आभार प्रदर्शन श्री संतोष पेडगावकर यांनी केले.

## परळीत आज शासन आपल्या दारी कार्यक्रम

# पंकजाताई अन् मी मिळून बीडचा विकास करु, धनंजय मुंडेंचे मोठे विधान

## विकासासाठी कोणत्याही मंचावर जाण्याची माझी तयारी– पंकजा मुंडे



**बीड / प्रतिनिधी**

**मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आज बीड दौऱ्यावर असून परळीतील गोपीनाथ गडावर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, दोन्ही उपमुख्यमंत्री दाखल झाले आहेत. भाजप राष्ट्रीय सचिव पंकजा मुंडेही गोपीनाथ गडावर उपस्थित असून त्यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे स्वागत केले आहे. तर धनंजय मुंडे यांनी मुख्यमंत्र्यांच्या गाडीचे स्टेअरिंग हाती घेतले आहे.महाराष्ट्र ज्यासाठी आतूर होता, तेच बीडमध्ये घडलं. भाजप नेत्या पंकजा मुंडे आणि राष्ट्रवादीचे नेते, तसेच बीडचे पालकमंत्री धनंजय मुंडे हे दोघे बहीण भाऊ एकाच मंचावर आले. यावेळी धनंजय मुंडे यांनी एक महत्त्वाची घोषणा केली. यापुढे पंकजाताई आणि मी मिळून बीडचा विकास करणार आहोत, अशी घोषणाच धनंजय मुंडे यांनी केली आहे.**

**बीडमधील तीर्थक्षेत्राचा विकास व्हावा, अशी अपेक्षा पंकजा मुंडे यांनी व्यक्त केली आहे. ओबीसी आरक्षणाचा मुद्दा मार्गी लावला तर शासन आपल्या दारीची गरज सरकारला पडणार नाही, लोक आपल्या दारी येऊन मतदान करतील असा विश्वास पंकजा मुंडे यांनी व्यक्त केला आहे.**

मुख्यमंत्री शिंदे, देवेंद्र फडणवीस, अजित पवार यांनी १४०० कोटींचा विकास कामांसाठीचा निधी दिला याबद्दल त्यांचे आभार मानतो, असे मत बीडचे पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी व्यक्त केले आहे. पंकजा ताई यांनी विकासाची सुरूवात केली, आज आपण विकासाच्या मध्यतरी आहोत, सगळे मिळून आपण विकास करु असे धनंजय मुंडे यांनी म्हटले आहे. नाशिक परिसरातील समुद्रातील पाणी जायकवाडीत कसे येईल यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत. राजकारणात कुणीच कायमचे मित्र किंवा शत्रू नसतो हे सर्वांनी लक्षात घेतले पाहिजे असे मत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी व्यक्त केले आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली सक्षमपणे काम सुरू आहे, हे निवडणुकांच्या निकालावरुन दिसून आले आहे. म्हणून राष्ट्रवादी काँग्रेसने नरेंद्र मोदी यांनी पाठबळ देण्यासाठी भाजपसोबत आलो आहोत. आमच्यात काही मदभेद नाही असेही अजित पवारांनी स्पष्ट केले आहे.आरक्षणाचा मागण्या सुरू आहेत, या प्रकरणी बाबासाहेब आंबेडकर यांनीसर्वांना अधिकार दिला आहे. सर्वांनी आपल्या मागण्या शांततेत मांडल्याच पाहिजे असे अजित पवार म्हणाले.

आरक्षणाला धक्का न लावता आम्ही आरक्षण देणार आहोत, जातीत तेढ निर्माण होऊ नये, हे सर्वांनी लक्षात ठेवायला हवे. शिवरायांनी सर्वांना सोबत घेऊन काम केले आहे – अजित पवार

विरोधकांकडे कोणताही मुद्दा नसल्याने ते आमच्यात वाद असल्याच्या चर्चा करत असतात असे म्हणत अजित पवारांनी विरोधकांवर जोरदार हल्लाबोल केला आहे.

महायुतीमध्ये कोणतेही मतभेद नाही, प्रत्येकाच्या विचारधारा वेगवेगळ्या असतात, मात्र, राज्य सरकार हे शेतकऱ्यांच्या पाठिशी आहे असे अजित पवार यांनी म्हटले आहे.

इतराच्या आरक्षणाला धक्का न लावता मराठा आरक्षण देणार असल्याचे अजित पवार यांनी म्हटले आहे. बीड जिल्ह्यातील लोकांना मुबलक पाणी मिळणार असल्याची ग्वाही अजितदादांनी दिली आहे. लोकांच्या दारी जाऊन उभे राहणे हे राज्य सरकसरचे धोरण असल्याचे अजित पवार यांनी म्हटले आहे. मोदींना पंतप्रधान करण्यासाठी तुमच्या मदतीची गरज आहे. शेतकऱ्यांसाठी धनंजय मुंडे यांची धडपड सुरू आहे. तीन राज्यात भाजपचे सरकार आले आहे. त्या राज्यातील काही योजना आहेत. ओबीसी आरक्षणाचा प्रश्न मार्गी लावा. लाडली बहिण सारखी योजना राबवा. आपल्याला लोकांच्या दारी जाण्याची वेळ येणार नाही.

# आमच्या अन्नात माती कालवू नका



**जळगाव – मराठा आरक्षणासाठी राज्यभर दौऱ्यावर निघालेल्या मनोज जरांगे पाटील यांनी पुन्हा एकदा राज्य सरकारला निर्वाणीचा इशारा दिला आहे. एकट्या छगन भुजबळ यांचे ऐकून सरकारने आमच्यावर कारवाई केली, तर त्याचे तीव्र परिणाम सरकारला भोगावे लागतील, असे ते म्हणालेत. ते जळगाव येथील सभेत बोलत होते.**

हा तुम्हाला जाहीर इशारा

मनोज जरांगे म्हणाले की, मराठ्यांच्या सरकारी नोंदी सापडल्या आहेत. त्यामुळे आम्ही सरसकट आरक्षण घेणारच. सरकारच नव्हे तर कुणीही आमच्या अन्नात माती कालवण्याचा प्रयत्न करु नये. सरकारी नोंदी सापडूनही आम्हाला आरक्षण दिले नाही, तर गाठ आमच्याशी आहे. हा तुम्हाला जाहीर इशारा आहे.

आम्हाला राज्यात शांतता हवी आहे. त्यामुळे सरकारने आपल्या आश्वासनानुसार सर्व गुन्हे मागे घ्यावेत. कार्यकर्त्यांचे अटकसत्र थांबवावे. या प्रकरणी दोषी असणाऱ्यांची आम्ही पाठराखण करणार नाही. पण निष्पाप लोकांना गुंतवणे थांबले पाहिजे, असे मनोज जरांगे पाटील म्हणाले.

त्याच्या सुरात सूर मिसळू नका

एकट्या छगन भुजबळ यांचे ऐकून आमच्यावर कारवाई झाली, तर सरकारला त्याचे परिणाम भोगावे लागतील. यापुढे तुम्ही त्यांच्याच गळ्यात हात टाकून फिरा. मराठा समाजाच्या दारातही उभे राहू नका. २४ डिसेंबर रोजी महाराष्ट्रातील सर्व मराठा समाजाला आरक्षण देण्याचे आपले ठरले आहे. त्यानुसार तुम्ही तातडीने त्याची अंमलबजावणी करा. त्याच्या (भुजबळ) सुरात सूर मिसळू नका. तुम्ही त्याच्या दबावाला बळी पडून अन्याय केला तर मराठे ५५ टक्के आहेत हे विसरु नका, असेही मनोज जरांगे पाटील यावेळी सरकारला इशारा देताना म्हणाले.


# मराठ्यांना नडू नका, तुमच्या आश्वासनाच्या क्लीप व्हायरल करू

## मनोज जरांगेंचा थेट गिरीश महाजनांना इशारा

प्रतिनिधी । बुलढाणा

मराठा समाजाला सरसकट कुणबी प्रमाणपत्र देता येणार नाहीत, ज्यांच्या नोंदी त्यांनाच प्रमाणपत्र मिळणार असे वक्तव्य मंत्री गिरीश महाजन यांनी केले आहे. गिरीश महाजन यांच्या वक्तव्यानंतर मनोज जरांगेनी महाजनांवर निशाणा सधला आहे. गिरीश महाजनांनी चुकीचे वक्तव्ये करू नयेत. त्यांनी दिलेल्या आश्वासनांच्या रेकॉर्डिंग आमच्याकडे आहे. एवढ्या मोठ्या उंचीच्या नेत्याने भरकटल्यासारखी वक्तव्ये करू नये. विनाकारण मराठ्यांना नडू नका, अन्यथा त्यांच्या आश्वासनाच्या क्लिप राज्यभर व्हायरल करू, असा थेट इशारा जरांगेंनी महाजनांना दिला आहे. ते बुलढाण्यात बोलत होते.

मनोज जरांगे म्हणाले, पश्चिम महाराष्ट्रातील आणि खानदेशातील मराठे एकत्र येत नाही असे म्हटले जायचे पण सभेची गर्दी पाहून तुमच्या लक्षात येईल. गिरीश महाजनांनी विचार करावा आणि नंतर वक्तव्ये करावीत. त्यांनी आपल्या मागणी पूर्ण करण्यासाठी वेळ मागितला होता. त्यानंतर त्यांना आपण वेळ दिला होता. आमच्याकडे त्यांनी दिलेल्या आश्वासनाचे अनेक पुरावे आहेत. चुकीची वक्तव्ये करून समाजाची



दिशाभूल करू नका. अन्यथा आम्ही त्यांच्या आश्वासनाच्या क्लिप राज्यभर व्हायरल करु.



# वायुदलाचं ट्रेनर विमान कोसळलं

## दोन वैमानिकांचा मृत्यू

तेलंगणामधून एक मोठी दुर्घटना समोर आली आहे. तेलंगणातील दिंडीगुल येथील एअर फोर्स अकादमी येथे प्रशिक्षणादरम्यान ट्रेनर विमान कोसळल्याची बातमी समोर आली आहे. मेडक जिल्ह्यात ही घटना घडली. या दुर्घटनेत दोन भारतीय वायुदलाच्या वैमानिकांचा मृत्यू झाला. मृतांमध्ये एक वैमानिकांध्ये एक प्रशिक्षक आणि एका कॅडेटचा समावेश आहे.

# ...म्हणून मी मंचावर आले; 'शासन आपल्या दारी' कार्यक्रमात पंकजा मुंडे यांची स्पष्टोक्ती

बीड- परळीत शासन आपल्या दारी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, कृषी मंत्री धनंजय मुंडे, माजी मंत्री पंकजा मुंडे हे कार्यक्रमाला उपस्थित होते. यावेळी पंकजा मुंडे नेमकं काय बोलतील याकडे सगळ्यांचे लक्ष लागले होते.

मी मंचावर का आले? याबाबत पंकजा मुंडे यांनी भाष्य केलं. खासदार प्रीतम मुंडे या कार्यक्रमाला आल्या नाहीत. त्या संसदेच्या अधिवेशनात आहेत. त्यांचे प्रतिनिधी म्हणून मी या कार्यक्रमाला आली आहे. परळीची कन्या म्हणूनही मी इथे आली आहे. आणि या परळीचा विकास होण्यासाठी कोणत्याही मंचावर जाण्याची तयारी माझी आहे. हे दाखवण्यासाठी आणि एक चांगला संदेश देण्यासाठी मी मंचावर आले आहे, असं त्या म्हणाल्या.माझ्या राजकारणाच्या जीवनात मी पालकमंत्री होते. तेव्हा जात -पात पाहिली नाही. पक्ष देखील पाहिला नाही. मनात द्वेष ठेवला नाही. त्यामुळे या लोकांचं कर्ज माझ्या आणि धनंजय मुंडे यांच्या डोक्यावर आले. आमच्या डोक्यावर ज्यांचा आशीर्वाद आहे त्यांना परळीच्या जनतेने प्रेम दिलं आहे. त्यामुळे परत त्यांना काही देणं आमचं कर्तव्य आहे,



गोपीनाथ गड नतमस्तक महाराष्ट्राचे मुख्यमंत्री मा ना श्री एकनाथरावजी शिंदे साहेब गोपीनाथ गडावर आले अस्ता त्यांचे स्वागत करताना लोकनेत्या पंकजाताई गोपीनाथराव मुंडे यांनी केला यावेळी राजेश गिते, सतिष मुंढे सह ताईसाहेब समर्थक उपस्थित होते.

# अंबाजोगाईतील आणखी ३८ अंतर्गत रस्त्यांसाठी १५० कोटींचा निधी मंजूर

## आ. नमिता मुंडदांच्या प्रयत्नांमुळे अंबाजोगाईत विकासकामांचा महापूर

**अंबाजोगाई ।प्रतिनिधी**

केज मतदार संघाच्या विकासाभिमुख आमदार नमिता मुंदडा यांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे अंबाजोगाई शहरात विकासाचा महापुर आल्याचे चित्र निर्माण झाले आहे. गतवर्षी शहरातील अंतर्गत रस्त्यांसाठी दिडशे कोटी रूपयांचा निधी मंजूर करण्यात आला होता. त्यानंतर अवघ्या वर्षभरातच शहरातील अन्य ३८ रस्त्यांसाठी आणखी दिडशे कोटी रूपयांच्या निधीला राज्य शासनाने सोमवारी (दि.०४) मंजुरी दिली. यामुळे लवकरच अंबाजोगाईतील जवळपास सर्वच रस्ते सिमेंट काँक्रीटचे होणार असून पुढील अनेक वर्षे नागरिकांचा प्रवास सुखकर होणार आहे.



शांत आणि सुसंस्कृत, शैक्षणिक वातावरणामुळे अंबाजोगाईत राहण्यासाठी आजूबाजूच्या गावातील लोक प्राधान्य देतात. त्यामुळे नवनवीन वसाहती तयार होत असून शहर वेगाने वाढत आहे, त्यासोबतच लोकसंख्याही वाढत आहे. वाढत्या शहरीकरणाची गरज लक्षात घेऊन आ. मुंदडा यांनी शहरासाठीच्या विकासकामांकडे विशेष लक्ष दिले आहे. रस्त्यांची वारंवार होणारी दुरावस्था लक्षात घेऊन शहरात सिमेंट काँक्रीटचे पक्के रस्ते उपलब्ध करून देण्यासाठी त्यांनी शासनाकडे पाठपुरावा सुरु ठेवला होता. त्यांच्या प्रयत्नांना यश मिळून मागील वर्षी शहरातील अंतर्गत रस्त्यांसाठी १०५ कोटी रूपये तर मुख्य रस्त्यासाठी ४४ कोटी रूपये असा निधी प्राप्त झाला होता. त्यानंतर आ.मुंदडा यांनी शहरातील अंतर्गत प्रमुख रस्त्यांसह गल्ली बोळातील रस्त्यांचे रूपडे पालटण्यासाठी प्रयत्न सुरूच ठेवले. आ. मुंदडा यांचे कर्तृत्व लक्षात घेत राज्य सरकारने मुक्त हस्त देत सोमवारी अंबाजोगाई शहरातील एकुण ३८ रस्त्यांसाठी १५० कोटी ३४ लाख रूपयांचा निधी मंजूर केला आहे. हे सर्व रस्ते सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत करण्यात येणार असून लवकरच या कामाच्या निविदा निघणार आहेत. त्यामुळे लवकरच अंबाजोगाईकरांची खड्डेमय रस्त्यांच्या त्रासातून मुक्तता होणार आहे. अंबाजोगाईच्या विकासासाठी मोठा निधी उपलब्ध करून दिल्याबद्दल मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, भाजपच्या राष्ट्रीय सचिव पंकजा मुंडे, खासदार प्रीतम मुंडे यांचे आ. नमिता मुंदडा यांनी विशेष आभार मानले आहेत. या सर्व वरिष्ठ नेत्यांनी आ. नमिता मुंदडा यांच्या कार्यकुशलतेवर विश्वास ठेवत त्यांना वारंवार सहकार्य करून पाठीशी असल्याचे दाखवून दिले आहे.

### अन्य विकासकामांच्या निधीसाठी प्रयत्न सुरू

अंबाजोगाई शहरातील नागरिकांना शब्द दिल्याप्रमाणे विकासकामांच्या दुसर्या टप्प्यात १५० कोटी रूपयांचा निधी मंजूर झाला आहे. शहराच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने भविष्यात अन्य विकासकामांसाठी भरघोस निधी आणण्याचे प्रयत्न सुरु आहेत. त्यासोबतच ग्रामीण भागातील रस्त्यांसाठी देखील सातत्याने पाठपुरावा सुरु आहे.

# गेवराई उपजिल्हा रुग्णालयातील एक्स-रे व सोनोग्राफी मशीन तत्काळ सुरू करा - छावाचे सी, एस, यांना निवेदन

**प्रतिनिधी/गेवराई संचार उमाप**

उपजिल्हा रुग्णालय गेवराई येथे अनेक दिवसापासून एक्सरे मशीन बंद आहे,त्यामुळे अक्सिजेंड झालेल्या रुग्णांना या ठिकाणी एक्सरे काढण्याची सुविधा बंद आहे.त्यामुळे त्यांना त्यासाठी बीडला किंव्हा खाजगी रुग्णालयात जावे लागत आहे.तसेच येथील सोनोग्राफी मशीन देखील अनेक दिवसापासून बंद असून याठिकाणी सर्व सामान्य जनतेला सोनोग्राफी साठी खाजगी रुग्णालयात जावे लागत आहे.तसेच गेवराई येथील उप जिल्हा रुग्णालयात रुग्ण गेल्यानंतर अनेक वेळा येथे औषध उपलब्ध नसतात.व अनेक वेळा डॉक्टर देखील उपलब्ध नसतात.तरी येथील औषध जास्त प्रमाणात देण्यात यावे.व जे डॉक्ट्रर हजार नसतात त्यांच्यावर कार्यवाही करण्यात यावी.तसेच या रुग्णालयात नवजात जन्माला आलेली बालक ज्या वर्डात ऍडमिट असतात.त्याच वार्डात व्हायरल इन्स्पेक्शनचे रुग्ण देखील ऍडमिट असतात.त्यामुळे त्यांना वेगवेगळ्या वार्डात ऍडमिट करण्याची सोय तात्काळ करावी.व रुग्णालयात स्वच्छ्ता नसते त्यामुळे रुग्णाला याचा त्रास होत असतो तरी रुग्णालयात स्वच्छ्ता नेहमी ठेवण्याचे आदेश देण्यात यावेत.तरी खालील सुविधा तात्काळ सुरू कराव्यात.१) एक्स-रे मशीन तात्काळ सुरू करावी २) सोनोग्राफी मशीन तात्काळ सुरू करावी. ३) औषध पुरवठा जास्त प्रमाणात करण्यात यावा. ४) जे डॉक्टर वेळेवर हजर नसतात त्यांची चौकशी करून कारवाई करावी. ५) रुग्णालय रोज स्वच्छ करावे. ६) तसेच गेवराई तालुक्यातील सर्व सरकारी व खाजगी रुग्णालयात रुग्ण हक्काची सनद तात्काळ लावण्यात यावी. तरी येत्या १४/१२/२०२३ वार-गुरुवार पर्यंत सर्व सुविधा सुरू कराव्यात अन्यथा छावा क्रांतिवीर सेनेकडून उपजिल्हा रुग्णालय गेवराई येथे धरणे आंदोलन सुरू करण्यात येईल असे निवेदन छावा क्रांतिवीर सेनेकडून जिल्हा शल्य चिकित्सक बीड यांना देण्यात आले आहे.अशी माहिती जिल्हाप्रमुख राहुल चाळक यांनी दिली आहे.







# एकल महिला संघटना वतीने वडवणीत महिला हिंसाचार विरोधात संवाद यात्रा

**बीड ।प्रतिनिधी**


बीड जिल्ह्यातील वडवणी येथे एकल महिला संघटना च्या वतीने भव्य रॅली चे नियोजन करण्यात आले होते. डॉ बाबासाहेब आंबेडकर चौक ते परळी मेन रोड संवाद रॅली काढण्यात आली. व संविधान चौक या ठिकाणी संविधान प्रास्ताविक वाचन करून समारोप करण्यात आला. यावेळी महाराणी ताराबाई माध्यमिक विद्यालय, व शिंदफना माध्यमिक विद्यालय च्या मुली मोठ्या संख्येने सहभागी झाल्या होत्या तर वडवणी सहाय्यक पोलिस निरीक्षक सिरसाट साहेब, व महिला कर्मचारी यांचे मोलाचे सहकार्य मिळाले. तसेच शाळेतील प्राचार्य, शिक्षक, शिक्षिका, पत्रकार यांचे सहकार्य लाभले. महिला मुली पुरुष मोठया संख्येने उपस्थित होते यावेळी काकडे सर,एकल महिला संघटना च्या रुक्मिणी नागापुरे, मुजमुले सर, कदम सर, सोनवणे सर, व गितांजली लव्हाळे मॅडम यांचे विशेष सहकार्य लाभले.

# माता व बाल रुग्णालयाची २०० खाटांची ईमारत निधी अभावी धुळखात पडुन

## शासन जिल्हा रुग्णालयाच्या दारी येईल काय?? :- डॉ.गणेश ढवळे

**बीड ।प्रतिनिधी**

१५ ऑगस्ट पासून महाराष्ट्र शासनाने आरोग्यसेवा मोफत करण्याचा निर्णय घेतला तेव्हापासून बीड जिल्हा रुग्णालयातील आंतररुग्ण व बाह्यरुग्ण रुग्णसंखेत कमालीची वाढ झाली असून बीड जिल्हा रुग्णालयाची आंतररुग्ण क्षमता ३२० आहे तर दररोज ४०० ते ५०० रुग्ण उपचारासाठी येत असतात.जिल्हा रूग्णालयाच्या आवारात राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत माता व बाल रुग्णालयासाठी इमारतीचे बांधकाम पुर्ण झाले असुन केवळ विद्युतीकरण व लिफ्ट साठी निधी रखडल्याने ईमारत ८ महिन्यांपासून धुळखात पडुन असुन त्यासाठी तातडीने निधी देण्यात यावा अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे यांनी पालकमंत्री धनंजय मुंडे केली होती.त्यानंतर आक्टोबर मध्ये झालेल्या आढावा बैठकीत जिल्हा रुग्णालयाची पाहणी करुन महिन्याभरात कामे पुर्ण करुन ईमारत वापरात येईल असे आश्वासन दिले होते.परंतु फायर सेफ्टी व लिफ्टचे काम पूर्ण करण्यासाठी साडे ३ कोटी रूपयांची आवश्यक असुन निधी न मिळाल्याने ईमारत धुळखात पडुन आहे.त्यामुळे तातडीने निधी देण्यात यावा अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे यांनी जिल्हाधिकारी, जिल्हा शल्यचिकित्सक बीड यांच्या मार्फत मुख्यमंत्री, प्रधान सचिव, आरोग्यमंत्री, सचिव सार्वजनिक आरोग्य विभाग मंत्रालय मुंबई आणि पालकमंत्री बीड धनंजय मुंडे यांना केली आहे.



सन २०१६-१७ साली जिल्हा रुग्णालयाच्या आवारात राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत माता व बाल रुग्णालय उभारण्याची मंजुरी मिळाली होती.त्यासाठी २१ कोटी रूपयांचा निधीची तरतूद करण्यात आली होती.मात्र कंत्राटदारांच्या ढिसाळ कारभारामुळे काम वेळेत पूर्ण झाले नाही.तत्कालीन जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.सुरेश साबळे यांनी पाठपुरावा करत कामात गती आणत ८ महिन्यांपूर्वी काम पूर्ण करण्यात आले.ऊर्वरीत फायरींग सेफ्टी आणि लिफ्ट या कामासाठी साडे ३ कोटी रुपयांच्या निधीची तरतूद करण्यात यावी अशी मागणी जिल्हा शल्यचिकित्सक बीड डॉ.अशोक बडे यांनी आरोग्य विभागाला व जिल्हा नियोजन समितीला केली आहे.मात्र अद्याप निधीची तरतूद करण्यात आली नसल्याने फायरींग सेफ्टी व दोन लिफ्टचे काम अपुर्ण असल्याने ईमारत वापरात नाही.वाढत्या रूग्ण संख्येमुळे जिल्हा रुग्णालयाच्या जुन्या इमारतीत गर्दी होत असुन सध्या जिल्हा रुग्णालयातील स्त्री रोग विभागात खाटा अपु-या पडत असुन यामुळे नवजात बालके व नवमातांची तारांबळ उडत असुन माता व बाल रुग्णालयाची ईमारत वापरात आणल्यानंतर रूग्णांची अडचण दुर होईल यासाठी शासन आपल्या दारी कार्यक्रमाच्या निमित्ताने पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी यासाठी साडे ३ कोटी रुपयांची तरतूद जिल्हा नियोजन समितीच्या निधीतून करण्यात यावी अशी मागणी करण्यात आली आहे.

# शिरूर येथील एकलव्य विद्यालयात विज्ञान प्रदर्शनाचे उद्घाटन

## तालुक्यातील शाळांचा मोठया प्रमाणावर सहभाग

शिरूरकासार (प्रशांत बाफना)

शहरातील एकलव्य विद्यालयात दोन दिवसीय तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले असून त्याचा लाभ घेण्याचे आवाहन गटशिक्षणाधिकारी जमीर शेख यांनी केले आहे.सिद्धेश्वर संस्थानचे महंत स्वामी विवेकानंद शास्त्री यांच्या शुभहस्ते या विज्ञान प्रदर्शनाचे उद्घाटन झाले असून व्यासपीठावर प्रथम नगराध्यक्ष रोहिदास पाटील गाडेकर,

नायब तहसीलदार बाळासाहेब खेडकर, प्रशांत जाधवर,गटशिक्षणाधिकारी जमीर शेख,केंद्रप्रमुख दिलीप जायभाये, शिवलिंग परळकर,युवा नेते दिनेश गाडेकर यांची उपस्थिती होती.गटशिक्षणाधिकारी कार्यालय,पंचायत समिती आणि एकलव्य विद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने एकावन्नव्या तालुकास्तरीय विज्ञान,गणित आणि पर्यावरण या विषयांचे प्रदर्शन तीन ते पाच डिसेंबर या कालावधीत पार पडणार आहे.सोमवारी दुपारी बारा वाजता विज्ञान प्रदर्शनाचे उद्घाटन झाले असून मंगळवारी दुपारी तीन वाजता मॉडर्न एज्युकेशन सोसायटीचे विश्वस्त प्रा.सचिन सानप आणि गटविकास अधिकारी संजय केंद्रे यांच्या हस्ते बक्षीस वितरण होणार आहे.या प्रदर्शनाचा लाभ घेण्याचे आवाहन गटशिक्षणाधिकारी जमीर शेख यांच्यासह विस्तार अधिकारी नारायण मुरूमकर,एकलव्य विद्यालयाचे प्राचार्य निलेश पोकळे यांनी केले आहे.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संभाजी सोनवणे यांनी तर आभारप्रदर्शन शाहीर अनिल तिवारी यांनी केले




# पोटाची खळगी भरण्यासाठी गेलेल्या उमापूर येथील ऊसतोड कामगारावर काळाचा घाला

## शिरूर- मलठण रस्त्यावरील अण्णापूर येथे अपघातात एकाचा मृत्यू तर तीन जखमी !

गेवराई । प्रतिनिधी

शिरूर- मलठण रस्त्यावर अण्णापूर (ता. शिरूर) येथे रविवारी (ता. ३) दुपारी दीडच्या सुमारास दोन दुचाकींची समोरासमोर धडक होऊन झालेल्या अपघातात एका दुचाकीस्वाराचा मृत्यू झाला. या अपघातात दोन्ही दुचाकींवरील इतर तिघे जखमी झाले.

योगेश अशोक जाधव (वय २४, रा. उमापूर, ता. गेवराई, जि. बीड), असे या अपघातात मृत्युमुखी पडलेल्या तरुणाचे नाव असून, त्याच्या दुचाकीवर मागे बसलेले अण्णासाहेब संपत चव्हाण व संभाजी वसंत आडे, हे तसेच; दुसऱ्या दुचाकीचे चालक भाऊसाहेब नाना ठोंबरे (रा. कर्डेलवाडी, ता. शिरूर) हे या अपघातात जखमी झाले.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, योगेश जाधव, संपत चव्हाण व संभाजी आडे हे गेवराई तालुक्यातील ऊसतोड कामगार असून, देवीभोयरे येथील क्रांती शुगर एंड पॉवर या साखर कारखान्यासाठी ऊसतोडीचे काम करीत असल्याने ते सध्या वडनेर (ता. शिरूर) येथे वास्तव्यास आहेत. कारखान्याच्या सुपरवायझरला भेटून उसाची पाहणी करण्यासाठी म्हणून ते सकाळी दुचाकीने (क्र. एम.एच. २३ बी.एफ. ६५७४) वाडेगव्हाण (ता. पारनेर, जि. नगर) येथे गेले होते. ऊस पाहणी करून पुन्हा वडनेरला जात असताना अण्णापूरजवळील 'हॉटेल देवकीनंदन'समोर हॉटेलच्या आवारातून भाऊसाहेब ठोंबरे हे त्यांची दुचाकी (क्र. एमएच १२ ईव्ही ५९६५) भरधाव घेऊन रस्त्यावर आल्याने दोन्ही दुचाकींची समोरासमोर धडक झाली. त्यात योगेश याचा मृत्यू झाला. शिरूरच्या पोलिस पथकाने तातडीने अपघातस्थळी धाव घेऊन अपघातग्रस्त दुचाकी बाजूला केल्या व जखमींना रूग्णालयात हलविले.






साखळी उपोषण गुंधा मराठा योद्धा मनोज जरांगे पाटील यांच्या समर्थनार्थ सुदर्शन दादा मोरे यांचे ६ दिवसाचे आमरण उपोषण मागे घेतल्यानंतर... आज गुंधा येथील चालू असलेला मराठा आरक्षण साखळी उपोषणाचा ३४ वा दिवस चालू असून,आपल्या गावातील ज्येष्ठ नागरिक शिवाजी सुदाम मोरे यांचे २४ तासाचे उपोषण संपन्न झाले... यावेळी शिवाजी सुदाम मोरे यांच्या समवेत,गावातील ज्येष्ठ समाज बांधव, सर्व ब्राम्हणाथ तरुण मित्र मंडळ उपस्थित होते...धन्यवाद आपले वयाच्या ५५ व्या वर्षी समाजासाठी योगदान देण्याचा योग लाभल. व अशीच समाज सेवा आपल्या हातून घडत राहो. हीच ईश्वर चरणी प्रार्थना... एकच मिशन मराठा आरक्षण. सकल मराठा समाज बांधव गुंधा.

# माजी मंत्री जयदत्त अण्णा क्षीरसागर यांच्या वाढदिवसानिमित्त आश्रम शाळा पोखरी या ठिकाणी भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन



बीड ।प्रतिनिधी

आदर्श शिक्षण संस्था संचालित आश्रम शाळा पोखरी तालुका जिल्हा बीड दिनांक ७ /१२ /२०२३ रोजी लोकनेते माजी मंत्री महाराष्ट्र राज्य तथा आदर्श शिक्षण संस्था बीडचे सचिव माननीय श्री जयदत्त अण्णा क्षीरसागर यांच्या वाढदिवसानिमित्त भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे, तरी नाळवंडी सर्कल परिसरातील पालक कार्यकर्ते सर्व आजी-माजी पदाधिकारी यांनी सर्वांना रक्तदान करण्यासाठी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, आश्रम शाळा पोखरी यथे ठीक दहा वाजता उपस्थित राहावे असे आवाहन बबलू राऊत यांनी केले आहे.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT